# माझ्या आजोबांचा डबा



अदिती देवधर

# माझ्या आजोबांचा डबा

गोष्ट व चित्रे

अदिती देवधर

१५ मे २०२३

www.aditideodhar.com

यश त्याच्या आजी-आजोबांच्या घरी गेला होता. आजीने त्याला खास मदतीला बोलावलं होतं.

आता आजी-आजोबा दोघंच रहात होते. त्यांच्याकडे भांडी मात्र भरपूर होती. आजीने ठरवले नवीन लग्न झालेल्या जोडप्यांना ती द्यायची. ही भांडी त्यांना उपयोगी पडतीलच शिवाय त्यांना उगीच नवीन भांडी आणण्याचा खर्च नको. आत्तापर्यंत बरीच भांडी देऊन झाली होती, तरी आणखी माळ्यावर होती.

भांडी माळ्यावरून खाली काढायला आजीला यशची मदत हवी होती. एरवी हे काम स्वानंद, म्हणजे यशच्या दादाकडे असायचं, तो उंच होता ना. पण गेल्या सहा महिन्यात यशची ऊंची वाढून जवळजवळ दादाएवढी झाली होती. आजीने आपल्याला बोलावलं म्हणून यशला भारी वाटत होतं.

आजीने स्टूल धरून ठेवलं आणि यश वर चढला. एकेक भांडं आजीकडे देत होता.

“आजी, अगं तुझ्याकडे सोन्याची परात आहे”, माळ्यावरच्या पिवळ्या धमक परातीकडे बघत यश हळूच कुजबुजला.

“सोन्याची?” आजी गोंधळली. यशने परात खाली काढून आजीपुढे धरली.

“अरे, ही पितळ्याची आहे. देवळात घंटा वाजवायला तुला आवडते ना, ती पितळ्याचीच असते. पूर्वी पितळ्याचीच भांडी वापरायचो आम्ही.” आजी म्हणाली.

“हू”, म्हणत यशने परात आत ठेवली. ती सोन्याची नाही म्हणल्यावर त्याला फारसा रस नव्हता शिवाय आणखी एका गोष्टीने त्याचे लक्ष आता वेधले होते.

परातीच्या मागे एक स्टीलचा डबा त्याला दिसला, एकावर एक असे तीन डबे होते.

त्याने तो आजीपुढे धरला.

“हा तर तुझ्या बाबाचा डबा आहे,” आजी म्हणाली.

“बाबाचा?”

“हो, शाळा आणि नंतर कॉलेजलासुद्धा हाच डबा न्यायचा तो. त्याचं नावही आहे बघ त्यावर,” आजी म्हणाली.

“खरंच की”, उजेडात डबा निरखत यश म्हणाला, “एवढी वर्षे वापरूनही काहीच झालं नाहीये.”

“स्टीलच्या डब्याला काय होणार. तुझ्या आजोबांचा डबाही आहे अजून. ऑफिसला चाळीस वर्षे न्यायचे ते. तूच काय तुझा नातूही वापरेल हा”, आजी कपाटातून एक डबा काढत म्हणाली.

“काय”, यशने स्टूलवरून टूणकन उडीच मारली.

आजीच्या हातातला डबा भारीच होता. बाबाच्या डब्यासारखाच, तीन छोटे डबे असलेला, पण थोड्या वेगळ्या आकाराचा.



“आजी, मी घेऊन जाऊ?” त्याने विचारले.

“तू काय करणार त्याचं?” आजीचा प्रश्न.

“ते माहित नाही, पण मला डबा जाम आवडलाय” यश म्हणाला.

“अहो, यशला तुमचा डबा हवा आहे, नेऊ दे का?” आजीने आजोबांना विचारलं.

“मी निवृत्त झाल्यापासून कुठे तो डबा वापरलाय. तुझेच दागिने असतात ना त्यात हल्ली. तुला काही हरकत नसेल तर खुशाल नेऊ दे की” एवढं बोलून आजोबा परत शब्दकोडं सोडवण्यात गर्क झाले.

“मला काय हरकत असणार” असं म्हणत आजीने तिचे दागिने दुसऱ्या डब्यात ठेवायलाही सुरुवात केली होती.

“हं, हा घे”, म्हणत तिने डबा यशच्या हातात दिला.

यश डबा घेऊन घरी आला. एकदम खजिनाच मिळाल्यासारखं त्याला वाटत होतं. त्याने डबा त्याच्या खोलीत टेबलावर ठेवला.

“यश, अरे ती रोपं लावायची आहेत ना आपल्याला, मागच्या आठवड्यात आणली होती. तशीच पिशवीत आहेत अजून”, बाबाची हाक आली.

“आलो आलो”, म्हणत यशने डबा त्याच्या खोलीत टेबलावर ठेवला. दाराजवळच्या कपाटातून कुदळ-फावडं, आणि खुरपं काढून तो बागेत धावला.

खास बागकामासाठी ठेवलेला जुना टीशर्ट आणि जीन्स घालून बाबा तयार होता. “ह्या रोपांना सावली लागते. ती इथे वावळाच्या जवळ लावायाची का?” बाबा यशला म्हणाला.

“हो, आणि ती फुलझाडं इथे कट्ट्याजवळ लावूयात. इथे पाच-सहा तास तरी नक्की ऊन असतं”, यश कट्ट्याकडे बोट दाखवत म्हणाला.

“गुड आयडिया!” कुदळ घेत बाबा म्हणाला.

“बाबा, तू कट्ट्याजवळ खड्डे खण, वावळाच्या जवळचे मी खणतो. तिथली माती भुसभुशीत आहे. खुरप्यानेसुद्धा खणता येईल”, यश खुरपे उचलत म्हणाला.

बाबाबरोबर बागेत काम करणं यशला खूप आवडायचं. दादा आणि आईला बागकामाची विशेष आवड नव्हती. हे खास त्याचं आणि बाबाचं काम होतं.

आई आणि दादा कुठे गेले की येताना ही एवढी पुस्तकं घेऊन यायचे तर यश आणि बाबा रोपं. त्यांच्या कारमध्ये माणसं कमी आणि पुस्तकं, रोपं आणि बागकामाची सामुग्रीच जास्ती असायची.



वावळाच्या जवळ यशने खुरप्याने खणायला सुरुवात केली. खरंच भराभर माती निघत होती. दिवसभर वावळाची सावली असल्याने ह्या जागी सूर्यप्रकाश थेट असा यायचाच नाही. त्यामुळे माती कायम ओलसर असायची. उकरलेल्या मातीचा शेजारी मोठा ढीग होऊ लागला.


आता आणखी थोडं खणलं की झालं यश अंदाज घेत म्हणाला आणि त्याने खुरपं परत मातीत घातलं.

‘बद्’ असा आवाज आला. माती किंवा दगडाला खुरपं लागलं नव्हतं. वेगळीच काहीतरी वस्तू होती.

त्याने खुरप्याच्या टोकाने बाजूने उकरलं आणि हळूहळू ती वस्तू मातीतून मोकळी केली. हातात धरून त्यावरची माती बाजूला केल्यावर ती काय वस्तू आहे हे यशला कळलं. त्याचे डोळे आश्चर्याने मोठे झाले.

“काय रे, काय झालं”, खुरप्याचा आवाज थांबला म्हणून बाबाने वळून विचारलं.

“बाबा, हे बघ मला काय मिळालं,” यश हातातली वस्तू पुढे करत म्हणाला.



“काय आहे ते”, बाबाला काही ते ओळखता आलं नाही.


“अरे, मी दुसरीत असताना नाही का, बॅटमॅनचा स्टीकर असलेला डबा आणला होता. त्याचं झाकण आहे”, यश उत्साहाने म्हणाला.

यतीनकडे स्पायडरमॅनचा स्टीकर असलेला डबा होता, लाल डबा आणि पिवळं झाकण. एकदम भारी डबा होता तो. मग काय, यशने हट्ट करून आईला बॅटमॅनचा डबा आणायला लावला. त्याच्या डब्याचे झाकण निळे आणि डबा हिरवा होता.

हेच ते झाकण. आता त्याची अगदीच रया गेली होती. चिरा पडल्या होत्या, अनेक तुकडे गायब होते.


डबा नवीन आणला त्यादिवशी कधी एकदा शाळेत जातो आणि सगळ्यांना डबा दाखवतो असं यशला झालं होतं. जेवायच्या सुट्टीत सगळे मित्रमैत्रिणी ‘बघू, बघू’ म्हणत आजूबाजूला जमले.

डबा समोर धरून, “आय ॲम बॅटमॅन” असं यश धीरगंभीर आवाजात म्हणाला आणि सगळे हसले. तो दिवसच काय पण पुढचा आख्खा आठवडा यश आणि त्याचा डबा हा चर्चेचा विषय होता.



महिन्याभरात मात्र पाण्यामुळे झाकणावरचा स्टीकर खराब व्हायला लागला. कड सुटून आली, चित्र फिकट व्हायला लागलं. सहा-सात महिन्यानंतर इथे कुठला तरी स्टीकर होता असं कळण्यापुरताच तो उरला. बॅटमॅन कधीच गायब झाला.

एक दिवस जेवण्याच्या सुट्टीत यश डबा उघडायला गेला तर झाकणाची कडीच त्याच्या हातात आली.



चारपैकी एक कडी तुटून गेली. नंतर आणखी एक तुटली. दोन कड्यांवर झाकण रहात होतं, नाही असं नाही. आधीसारखं घट्ट मात्र बसत नव्हतं.

एकदा डबा दप्तरात असतानाच तिसरी कडीही तुटली. मग काय, एकाच कडीवर झाकण कसं राहणार. सगळा उपमा दप्तरात सांडला. एवढा व्याप झाला. पुस्तक, वह्या, कंपास पेटी, सगळ्याला प्रसाद मिळाला.

आई वैतागली आणि तडक जाऊन नवीन डबा घेऊन आली. हा निळा आणि जांभळा होता. त्यावर 'इनक्रेडिबल हल्क' होता.

जुन्या डब्याचं काय करायचं, कारण डबा चांगला होता. मग बाबाने त्यात माती भरली आणि धने पेरले. कट्ट्यावर भरपूर ऊन यायचं, त्यावर तो ठेवून दिला.



कोशिंबीर किंवा पोह्यावर घालायला कोथिंबीर कापून आणायचं काम यशचं असायचं. बरेच दिवस त्या डब्यात कधी कोथिंबीर, कधी मेथी-पालक असायचं.

उन्हात राहून त्याच्या डब्याला चीरा पडल्या आणि मग तुकडे पडायला लागले. झाकणाचा तसा काहीच उपयोग नव्हता. ते इकडे तिकडे पडलं, कधीतरी बागेत टाकलं गेलं बहुतेक आणि मातीत गाडलं गेलं ते आज सापडलं.

डब्याचं पुढे काय झालं आठवत नाही. टाकून दिला बहुतेक.

यशने झाकण जेवढं स्वच्छ करता येतील तेवढं केलं आणि खोलीत टेबलावर आजोबांच्या डब्याला टेकवून ठेवलं.




डबा कुठे असेल काय माहिती, यश विचार करत होता.

असेल तरी का? असा विचार त्याच्या मनात आला आणि मागे कुठतरी वाचलेलं वाक्य आठवलं, ‘Every single molecule of plastic that has ever been manufactured is still somewhere in the environment, and some 100 million tons of it are floating in the oceans.’

‘जगभरात जेवढं प्लॅस्टिक आत्तापर्यंत निर्माण केलं गेलं आहे, ते सर्व आजही पर्यावरणात कुठेतरी अस्तित्वात आहे. आणि सुमारे दहा दशलक्ष टन प्लॅस्टिक हे समुद्रांत आहे’ त्यावेळी त्याने ह्या वाक्याचा विशेष विचार केला नव्हता. पण आता त्यांच्या डोक्यात चक्र सुरू झालं.

म्हणजे माझा डबा कुठेतरी आहे हे नक्की.

त्याचं आजोबांच्या डब्याकडे लक्ष गेलं. आजी म्हणाली होती चाळीस वर्षे रोज तो डबा आजोबा वापरत होते. आजोबा निवृत्त होऊनही आता वीस वर्षे झाली असतील बहुतेक. म्हणजे डबा कमीतकमी साठ वर्षांचा आहे. डबा आजही अगदी छान आहे. घासून घासून थोडे चरे आले आहेत, पण अगदीच किरकोळ.

“स्टीलला काय होणार आहे, तूच काय तुझाही नातूही वापरेल”, आजीचं वाक्य यशला आठवलं.

माझ्या आजोबांचा साठ वर्षांचा डबा आणि मी एक वर्षभर वापरलेला डबा. दोन्ही डबे अस्तित्वात आहेत.

फरक काय?

तर आजोबांचा डबा अजूनही चांगल्या स्थितीत आहे. पुढे साठ वर्षेही तो चांगल्या स्थितीत राहील.

माझा डबा मात्र, कुठेतरी आहे. कुठेतरी म्हणजे नक्की कुठे?

प्लॅस्टिकचं विघटन होत नाही. ते non-biodegradable आहे. पण ते photo-degrade होतं. फोटो म्हणजे प्रकाश. सूर्यप्रकाशामुळे प्लॅस्टिक कडक होतं आणि त्याचे तुकडे पडायला लागतात, आणखी छोटे छोटे तुकडे होत राहतात. ५ मि. मि.पेक्षा लहान आकाराच्या तुकड्यांना मायक्रोप्लॅस्टिक म्हणतात.

“माझ्या डब्याचे तुकडे होत होत मायक्रोप्लॅस्टिक तयार झाले असतील”, यशच्या मनात आलं.

हे तुकडे काय मग, कुठेही जातात.

आपले पूर्वज बराचसा काळ भटके जीवन जगत होते. शिकार करायचे, फळं आणि कंदमुळे गोळा करायचे. एखाद्या ठिकाणचा साठा संपला की तेथून दुसरीकडे जायचे.

बिया मातीत गेल्या की त्याच प्रकारचे रोप उगवते हे लक्षात आलं आणि हळूहळू आपलं अन्न आपण पिकवू लागलो म्हणजेच शेती करू लागलो. साधारण दहा हजार वर्षांपूर्वी शेतीची सुरुवात झाली.

आपला अन्नपुरवठा आपण निर्माण केल्याने आता एका ठिकाणहून दुसरीकडे जाण्याची गरज नव्हती. शिवाय पिकांची काळजी घेण्यासाठी त्याच ठिकाणी राहणे गरजेचे होते.

शेतीसाठी आणि राहण्यासाठी सगळ्यात चांगली जागं कुठली असेल? अर्थात नदीकाठ. पिण्यासाठी, इतर वापरासाठी आणि शेतीसाठी पाणी होते.

नदीला पूर येतो तेव्हा तिच्याबरोबर आणलेला गाळ ती काठावर पसरते. त्यामुळे नदीकाठांवरची माती अत्यंत सुपीक असते. त्यामुळेच नदीच्या काठाकाठाने वस्ती झाली, ती वाढत गेली आणि आज जी मोठी शहरे बघतो ती वसली.



सिंधू संस्कृती, इजिप्तची नाईल नदीच्या काठची संस्कृती. मेसोपोटेमियाची टिगरिस आणि युफ्रेटिस नद्यांच्या काठावरची संस्कृती. ह्या सगळ्या नदी संस्कृती आहेत. किंबहुना मेसोपोटेमिया शब्दाचा अर्थ Between two rivers म्हणजे दोन नद्यांमधला प्रदेश असा आहे.

नदी वाहते तेव्हा पाण्याच्या प्रवाहामुळे खडकांची झीज होते. दगड, माती नदी पुढे वाहून नेते. सतत वाहणाऱ्या पाण्यामुळे ही धूप होतच राहते. तेथे घळ तयार होते.

नदीवरच्या पुलावर उभं राहिलं की हे लक्षात येतं. नदी ही नेहमी आजूबाजूच्या प्रदेशापेक्षा खालच्या स्तरावर असते. आपण आत्ता पुलावर ज्या उंचीवर आहोत, एकेकाळी नदी त्या पातळीवरून वहात होती बरं का. तिने निर्माण केलेला जो खड्डा आहे तो एवढी वर्षे प्रवाहामुळे झालेली धूप.

नदी इतर प्रदेशाच्या तुलनेने खालच्या पातळीवर असल्याने पावसाचा पडलेला थेंब शेवटी नदीला येऊन मिळतो. पावसाचे पाणी पुढे वाहून नेणे हे एक खूप मोठे काम नदी करत असते. It provides drainage.

नदीला येऊन मिळणारे हे पाणी आपल्याबरोबर वाटेतल्या अनेक गोष्टी घेऊन येते. अशा तऱ्हेने कचरा म्हणून पडलेले प्लॅस्टिक नदीत जाते. एक नदी दुसरीला मिळते तेव्हा हा कचरा पुढे जातो. असं करत शेवटी सगळं कचरा हा समुद्रापर्यंत पोहोचतो. समुद्रात सापडणाऱ्या प्लॅस्टिकपैकी सुमारे ८०% हे अशा प्रकारेच तिथे पोहोचलेलं असतं.

पुणे शहराचे उदाहरण घ्यायचे तर मुळा आणि मुठा ह्या दोन मुख्य नद्या. पवना ही मुळा नदीची उपनदी. तर अंबी आणि मोशी ह्या मुठा नदीच्या.

मुळा-मुठा संगमानंतर मुळा-मुठा नदी शिरूर तालुक्यात रांजणगाव सांडस गावात भीमा नदीला मिळते. पुणे शहराचा नदीतला कचरा भीमा नदीत जातो. भीमा म्हणजेच पंढरपूरला जिला चंद्रभागा म्हणतात ती.

त्या आधी आहे सोलापूरजवळचे उजनी धरण, हे भीमा नदीवरचे महाराष्ट्रातले शेवटचे धरण. त्याला टर्मिनल डॅम म्हणतात. मुळा-मुठा, इंद्रायणी, भामा आणि इतर उपनदयांचे पाणी जसे भीमेत आणि उजनी धरणात येते तसेच त्यांनी आपापल्या प्रदेशातून वाहून आणलेला कचराही येतो.

धरण भरले की त्याचे दरवाजे उघडले जातात. मग हा सगळा कचरा पुढे कर्नाटकात भीमा जेव्हा कृष्णा नदीला मिळते तेव्हा तिच्यात जातो. कृष्णा नदी शेवटी आंध्रप्रदेशात बंगालच्या उपसागराला मिळते.

माझा डबा गेला कुठे? कदाचित त्याचं झाकण जसं मातीत खोल गाडलं गेलं तसाच डबा कुठेतरी मातीत असेल?

किंवा कुठे टेकडीच्या पायथ्याशी वगैरे?

असाच कुठेतरी पडलेला, एखाद्या पावसाळ्यात नदीत पोहोचला असेल? एका नदीतून दुसऱ्या नदीत? मग समुद्रात?

किंवा माझ्या शहाराजवळच्या गावातल्या कचरा डेपोमध्ये?

जगभरात एकूण प्लॅस्टिक निर्माण होतं त्याच्या सरासरी केवळ ९% प्लॅस्टिकचंच रिसायकलिंग होतं. रिसायकलिंग म्हणजे ते प्लॅस्टिक वितळवून त्याच्यापासून परत काही वस्तू तयार करणे. ९% म्हणजे समजा प्लॅस्टिकच्या १०० वस्तू असतील, तर फक्त ९ वस्तूंचं शेवटी रिसायकलिंग होतं? १०० पैकी फक्त ९?


बाकी ९१ वस्तू कुठे जातात तरी कुठे?

३% वस्तू शेवटी समुद्रात जातात? म्हणजे प्रत्येक १०० वस्तू ज्या तयार होतात, त्यातल्या ३ कचरा म्हणून समुद्रात जातात?

माझ्या डब्याचे तुकडे मातीत, नदीत, समुद्रात, कुठेही असतील.



समुद्रातले मासे अन्न समजून प्लॅस्टिकचे तुकडे खातात.



पक्षी जेव्हा मासे खातात तेव्हा हे तुकडे त्यांच्या पोटात जातात. अमेरिकेत एका मेलेल्या पक्ष्याच्या पोटात प्लॅस्टिकचे किती तुकडे मिळाले माहित आहे? तब्बल १६०३!!

यशच्या डोक्यातल्या विचारचक्राला आता चांगलीच गती मिळाली होती.

'माझ्या एका डब्याने निसर्गाचं किती नुकसान केलं. हे नुकसान चालूच आहे कारण तो डबा अजून आहेच.'


आणि त्याच्या डोक्यात पुढचा विचार आला. हा एकच डबा नाही. कधी कडी तुटली, कधी झाकणाला चीर गेली, ह्यामुळे वर्षाला दोन डबे तरी त्याला आणावेच लागतात. दादा कसा त्याच्या वस्तू नीट वापरतो वगैरे ऐकावं लागतंच शिवाय.

अगदी दादाचं उदाहरण घेतलं तरी त्याचा डबा दोन वर्षे टिकतो. अगदी दादासारखे वस्तू 'नीट' वापरणारा विद्यार्थी असेल तरी शाळेची पहिली ते दहावी अशा दहा वर्षांत तो पाच डबे तरी वापरतोच.

यशने एक पाठकोरा कागद आणि पेन्सिल घेतली आणि आकडे मांडायला सुरुवात केली.

प्रत्येक वर्गात साधारण पन्नास विद्यार्थी. पहिली ते दहावी अशा दहा इयत्ता. प्रत्येक इयत्तेच्या दोन तुकड्या. म्हणजे वीस वर्ग. प्रत्येक वर्गात पन्नास विद्यार्थी. म्हणजे शाळेत एकूण हजार विद्यार्थी.

प्रत्येकाचे पाच डबे म्हणजे दर दहा वर्षांनी माझ्या शाळेतल्या विद्यार्थ्यांचे एकूण ५००० प्लॅस्टिकचे डबे कचऱ्यात जातात.




वरच्या गणिताप्रमाणे केवळ ९% डब्यांचे रिसायकलिंग होणार, ३% समुद्रात जाणार, बाकीही कचरा म्हणून निसर्गात राहणार. किती वर्षे? कितीतरी हजार वर्षे.

माझ्या आजोबांसारखा स्टीलचा डबा जर आम्ही सगळ्यांनी वापरला तर?

हा डबा तयार करण्यासाठी स्टील वापरलं. स्टील हा alloy म्हणजे मिश्र धातू आहे. लोखंड आणि कार्बन पासून ते तयार होतं. लोखंड खाणीतून काढलं गेलं. निसर्गाचं नुकसान झालंच, नाही असं नाही.

डबा कारखान्यात तयार झाला तेव्हाही प्रदूषण झालंच. पण एवढंच. त्यानंतर आज ६० वर्षे झाली तो डबा वापरात आहे. अजून ६० वर्षे सहज वापरता येईल.

प्लॅस्टिकप्रमाणे स्टीलचेही विघटन होत नाही. पण स्टीलचे १००% रिसेकलिंग होते. प्लॅस्टिकचा दर्जा खालवातो तसे स्टीलचे होत नाही. म्हणजे माझ्या प्लॅस्टिकच्या डब्याचे रिसायकलिंग झाले तरी परत अशा प्रतीची वस्तू तयार होणार नाही. म्हणजे ज्यात अन्न खाता येईल असा डबा तयार होणार नाही. मग त्याची कुंडी, कचऱ्याचा डबा, अशा काहीतरी वस्तू होतील.

आजोबांच्या स्टीलच्या डब्याचे जेव्हा कधी रिसेलकिनग होईल तेव्हा त्याच प्रतीचे स्टील परत मिळेल, ज्यापासून परत डबा किंवा नवीन काहीतरी तितकीच उपयोगी वस्तू तयार करता येईल.

पहिलीत स्टीलचा डबा घेतला तर शाळाच काय कॉलेजलाही तो वापरता येईल. आजोबांनी वापरला तसा नंतरही वापरता येईल.

“चांगली कल्पना आहे. आपल्या मुख्याध्यापिकांना का नाही सांगत”, दादा त्याची आकडेवारी निरखत म्हणाला.

“विद्यार्थ्यांनी डबा कुठला आणावा हे त्या कसं सांगणार?” यश गोंधळला.

“का नाही. आपल्या शाळेत पुस्तकांना प्लॅस्टिकचे किंवा खाकी कागदाचे कव्हर घालायची परवानगी नाही. मुलं पाहिलीला प्रवेश घेतात तेव्हा पालकसभेत मुख्याध्या[पिका सांगतात, की पुस्तकाला कव्हर घालावे असा आमचा आग्रह नाही. तुम्हाला घालायचेच असेल तर वर्तमानपत्राचे घाला. प्लॅस्टिक किंवा बाजारातून विकत आणून घालायचे नाही.” दादा म्हणाला.

“हो, आणि आपल्या शाळेच्या नियम-पुस्तिकेतही हा नियम आहे.” यश म्हणाला.

“मी शाळेत गेलो तेव्हा हा नियम नव्याने केला होता. आपण पुस्तक वापरणार वर्षभर, आणि त्याला घातलेलं प्लॅस्टिकचं कव्हर निसर्गात राहणार पुढची कितीतरी हजार वर्षे, हा निव्वळ वेडेपणा आहे, असं मुख्याध्यापिका म्हणाल्या होत्या. त्यांचं वाक्य माझ्या डोक्यात पक्कं बसलं. ते पहिलंच वर्ष होतं, त्यामुळे एवढं सांगूनही काही मुलांनी प्लॅस्टिक कव्हर घातलंच होतं. त्यांना ते भर वर्गात काढायला लावलं. मुख्याध्यापिका ठाम राहिल्या त्यामुळे आता हा नियम सगळ्यांच्या अंगवळणी पडला आहे.” दादाने सांगितलं.

“आपल्याला ६ विषय असतात. १००० x ६ म्हणजे ६००० प्लॅस्टिकची कव्हरं दरवर्षी कचऱ्यात गेली असती, ते टळलं. खूप मोठा बदल आहे हा”, यश कागदावरचे आकडे बघत म्हणाला.

मुख्याध्यापकांकडे खूप मोठा बदल घडवायची क्षमता आहे. देशाच्या पातळीवर केंद्र सरकार, राज्याच्या पातळीवर राज्य सरकार, आपल्या शहराची महानगर पालिका तसेच शाळेसाठी मुख्याध्यापक ना. सरकार जसे कायदे करते तसे ते शाळेच्या पातळीवर करतात.” दादा म्हणाला.

“मुलं पाहिलीला प्रवेश घेतात तेव्हा त्यांनी शाळेसाठी काय काय खरेदी करायची ही यादी देतात. त्यात स्टीलचा डबाच हवा असा नियम शाळा करू शकते”, यशचा चेहरा खुलला.

“नक्कीच. शिवाय असा नियम का आहे, हेही ते सांगू शकतात. पहिले ते दहावी मुलं रोज शाळेत येणार आहेत. भरपूर वेळ आहे कारण सांगायला, चर्चा करायला.”

“मुख्याध्यापिका माझं ऐकतील का?” यशने शंका बोलून दाखवली.

“हे गणित त्यांना दाखव. तुझं म्हणणं बरोबर आहे, जगभरातल्या लोकांनी केलेला अभ्यास तुझ्यापाशी संदर्भ म्हणून आहे. तू जे सुचवतो आहेस, ते सगळ्यांच्या फायद्याचं आहे. आर्थिकदृष्ट्याही कमी खर्चाचा पर्याय आह.” दादा म्हणाला.

“ही आकडेवारी, संदर्भ सगळं घेऊन मी मुख्याध्यापिकांकडे जातोच”, यश उत्साहाने म्हणाला.

---

-----------------------------------------------

-----------------------------------

------------------

**खूप मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक आपल्या पर्यवारणात पसरलं आहे. आणखी प्लॅस्टिक पर्यावरणात जाणार नाही ह्यासाठी काम करणं आपल्या हातात आहे. सुरुवात करणं खूप महत्वाचं आहे.**

**प्लॅस्टिकच्या डब्याऐवजी स्टीलचा डबा वापरणं हा छोटासा निर्णय खूप मोठा सकारात्मक बदल घडवेल.**

**यशप्रमाणे आपणही करून बघायचं?**

---


संदर्भसूची आणि अधिक माहितीसाठी

१. Richard Grant for Telegraph [UK] 24th April 2009, Plastic Debris is polluting the world's oceans

२. Charles Moore, Plastic Ocean

३. https://ourworldindata.org/plastic-pollution

४. https://www.steel.org/sustainability/#:~:text=Steel%20is%20100%20percent%20recyclable,same%20quality%20again%20and%20again.